**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (महानगरपालिका न्यायालय), सोलापूर यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – सागर एस. जाधव)**

**सं. फौ. ख. क्र. २८४/२०२६**
**निशाणी क्र.**

## अपराधाचे विवरण
## PARTICULARS OF THE OFFENCE

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **घटना दिनांक** | : | ०४.०३.२०२६. |
| २. | **तक्रार दिनांक** | : | १०.०३.२०२६. |
| ३. | **तक्रारदाराचे नाव** | : | शहर वाहतुक शाखा, दक्षिण विभाग, सोलापूर तर्फे पोलिस निरीक्षक रविंद्रनाथ कृष्णा भंडारे |
| ४. | **आरोपींचे नाव,** | : | **इशान नंदकुमार वाघमारे** |
| | **वय, वयवसाय** | : | वय – २५ वर्षे, धंदा – मजुरी |
| | **व पत्ता** | : | राहणार – होटगी गाव, ता. दक्षिण सोलापूर, |
| | | : | जि. सोलापूर |
| ५. | **गुन्हा** | : | मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४, १२९/१९४(ड) व १४६/१९६ अन्वये |

६. **गुन्हयाचा तपशील** :

दिनांक ०४.०३.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास आसरा चौक, सोलापूर शहर येथे तुम्ही तुमच्याकडील वाहन क्र. एम.एच.१३ डी.एच. ७४७२ हे वाहन जास्त रहदारी असलेल्या रस्त्यावर नागमोडी, भरधाव वेगात बेजबाबदारपणे, वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करीत चालवून रस्त्यावरील ये–जा करणारे इतर वाहनांना व पादाचारींना धोका होईल अशारितीने वाहन चालविताना मिळून आलात. त्याचप्रमाणे सदर वाहनांचा विमा काढलेला दिसून आलेला नाही व वाहन चालविताना आपण हेल्मेट परिधान केलेले नाही. त्यामुळे इतर पादचारी, दुचारीस्वार व वाहन चालकांना अपघाताचा धोका निर्माण केलात त्याअन्वये मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १८४, १२९/१९४(ड) व १४६/१९६ अन्वये गुन्हा केला आहे व मी त्याची दखल घेतली आहे.

मी तुम्हास याद्वारे निर्देषीत करतो की, वरील प्रमाणे तुमच्यावर खटला चालविण्यात येईल.

**(सागर एस. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(महानगरपालिका न्यायालय), सोलापूर.

दिनांकः– १६.०३.२०२६

७. **आरोपींचे निवेदन**

प्रश्न क्र.१ तुम्हाला पोलिस तपासाची कागदपत्रांच्या नकला मिळाल्यात काय ?
उत्तर होय.
प्रश्न क्र.२ तुमचेवर ठेवलेला दोषारोप तुम्हाला समजला काय ?
उत्तर होय.

प्रश्न क्र.३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर होय.

**आरोपीची सही / अंगठा** **(सागर एस. जाधव)**
दिनांकः– १६.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(महानगरपालिका न्यायालय), सोलापूर.

## न्यायनिर्णय

आरोपी आज न्यायालयात हजर झाला. आरोपीने न्यायालयासमोर हजर होऊन गुन्ह्याच्या संदर्भात आरोपीचे म्हणणे लक्षात घेवून आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे. तसेच गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होण्याबाबत मी प्रत्यक्षपणे समजावून सांगीतले. आरोपीला गुन्हा कबुलीचा परिणाम सांगीतल्यानंतर देखील आरोपी गुन्हा कबुलीच्या निर्णयावर ठाम आहे. त्यावरून आरोपीने कोणत्याही दबावात न येता गुन्हा कबूल केल्याचे दिसुन येते. त्यामुळे आरोपीला मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १८४,१२९/१९४(ड) व १४६/१९६ अन्वये गुन्ह्यासाठी दोषी ठरविणेत येते. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप व दंडाची तरतूद लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी **इशान नंदकुमार वाघमारे** याला मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १८४, १२९/१९४(ड) व १४६/१९६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता दोषी ठरवण्यात येत आहे.

**२.** आरोपीला मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता **रूपये ४०००/– (अक्षरी रूपये चार हजार फक्त)** इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात येते.

**३.** आरोपीला मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १२९/१९४(ड) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता **रूपये १०००/– (अक्षरी रूपये एक हजार फक्त)** इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात येते. तसेच आरोपीला चालक अनुज्ञाप्ती धारण करणेपासून तीन महिने कालावधीकरीता अपात्र ठरविण्यात येत आहे.

**४.** आरोपीला मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १४६/१९६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता **रूपये २०००/– (अक्षरी रूपये दोन हजार फक्त)** इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात येते.

**५.** दंड न भरल्यास आरोपीला ३ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

**६.** आरोपीचा जामीनचा कदबा जर असल्यास, अभ्यर्पित करण्यात येत आहे.

**७.** न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला विनामुल्य देण्यात यावी.

**(सागर एस. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
दिनांकः– १६.०३.२०२६ (महानगरपालिका न्यायालय), सोलापूर.

<u>**CERTIFICATE**</u>

" I certify that this Judgment/Order uploaded is a true and correct copy of original signed Judgment/Order"

| | | |
|---|---|---|
| **Uploaded by** | **:** | **Pratiksha Vishal Pawar**<br>**Stenographer (Grade-III)** |
| Name of Court | :- | J.M.F.C. (Municipal Court), Solapur |
| Judgment dictated on | :- | **27.01.2025** |
| Judgment signed by the Presiding Officer on | :- | **27.01.2025** |
| **Judgment uploaded on** | **:-** | **27.01.2025** |